पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/०३/कावि/६२०/२०१७
दिनांक – १०/०२/२०१७

प्रति,

मा**........................................,**
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा दिनांक - १४/०२/२०१७ रोजी आयोजित केले बाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक १४/०२/२०१७ रोजी दुपारी ०२.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – २६५**

दिनांक -१४/०२/२०१७ वेळ – दुपारी ०२.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक १४/०२/२०१७ रोजी दुपारी ०२.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती पी.एम. सेंटर व डायलिसीस विभाग यांनी मागणी केलेनुसार फॉगर मशीन ०२ नग खरेदी करणेकामी कोटेशन नोटीस क्रं.०६/२०१६-१७ अन्वये दरपत्रके मागविणेत आले होते. त्यानुसार प्राप्त दरपत्रकांमध्ये मे.ऑस्टीन हेल्थ केअर, पुणे यांनी फॉगर मशीन ०२ नग खरेदी करणेकामी र.रु.२४,६००/- प्रती नग (सर्व करांसह) सादर केलेला दर लघुत्तम प्राप्त झाला असुन स्विकृत करणेत आला आहे. मे.ऑस्टीन हेल्थ केअर, पुणे यांचेकडून यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या पी.एम. सेंटर व डायलिसीस विभाग यांचेकरीता फॉगर मशीन ०२ नग र.रु.२४,६००/- प्रती नग(सर्व करांसह) प्रमाणे करारनामा न करता खरेदी करणेस व सदर फॉगर मशीन खरेदी करणेकामी होणा-या एकूण र.रु.४९,२००/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास हजार दोनशे फक्त) चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२) सन २०१६ चे बैंगलोर येथील दि.११ नोव्हेंबर २०१६ रोजी आयोजित केलेले Digital Citizen Summit करीता दि.११/११/२०१६ रोजी उपस्थित राहणेकामी श्री.निळकंठ पोमण, समन्वयक JNNURM तथा मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांनी स्वखर्चातून केलेल्या एकूण र.रू.७,२१७/- (अक्षरी रक्कम रूपये सात हजार दोनशे सतरा फक्त) ची प्रतिपुर्ती करणेकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २०१७ करिता मा. आयुक्त सो.यांचे अन्टीचेंबर मध्ये, उमेदवारी खर्च कक्षातील निवडणूकीचे कामकाजासाठी मा.मुलेप विभागासाठी व निवडणुक विभागासाठी आवश्यक Led Tv Screen साहित्य खरेदीकामी बाब क्र.०१ ते २ (Led Tv Screen (size 55") व Led Tv Screen (size40") साहित्य पुरवठा करणे कामी ऑनलाईन कोटेशन नो.क्र.४०/२०१६-१७ अन्वये मनपा वेबसाईटवर कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन सिलबंद लिफाप्यात

कोटेशनदर मागविण्यात आले होते. त्यानुसार सिलबंद लिफाप्यात तीन दरपत्रके प्राप्त झाली आहेत. प्राप्त दरपत्रकामध्ये मे.एस.एस.टेलिकॉम एंटरप्रायजेस, पुणे-०२ यांचे आवश्यक बाब क्र.१ ते २(एकूण ०४ नग) साहित्याचे र.रु.२,६१,०००/- लघुत्तम दर प्राप्त झाले आहेत. सदरचा खर्च हा अंदाज पत्रकीय रक्कमे पेक्षा ०.८१% ने कमी आहे. मे.एस.एस.टेलिकॉम एंटरप्रायजेस यांचे आवश्यक एलईडी टिव्ही साहित्य खरेदी करणेकामी एकूण र.रु.२,६१,०००/-दर स्विकृत करण्यात आले असून याकामी करारनामा करून पुरवठा आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणे.



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/०३/कावि/६२०/२०१७
दिनांक - १०/०२/२०१७

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत